महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष :- १ ले | अंक :- ०१ | सोमवार दि. ४ नोव्हेंबर २०२४ | पाने :- ४ किंमत ५ रु. | जळगाव

## खरी शिवसेना कुणाची? शिंदे की ठाकरे

### हे ४९ मतदारसंघ ठरविणार दोन्ही गटांचे भवितव्य




मुंबई :- विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीबाबतचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर राज्यातील ४९ मतदारसंघांत शिवसेना (एकनाथ शिंदे) विरुद्ध शिवसेना (उद्धव ठाकरे), असा थेट सामना होणार आहे. त्यापैकी पूर्वीच्या शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशात १९ जागांवर आणि एकट्या मुंबईत १२ ठिकाणी थेट सामना होणार आहे. मराठवाडा आणि कोकणात आठ, विदर्भात सहा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येकी चार जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होईल. मतदारांच्या नजरेतील बाळासाहेबांचा खरा वारसदार कोण? याचा निकाल या माध्यमातून लागणार आहे.

दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरही शिवसेना पक्षाचे आमदार निवडून आणण्याचे आव्हान आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात ते हे काम करीत आहेत. महायुतीचे सरकार परत आणणे आणि त्यात शिवसेनेच्या अधिकाधिक जागा असणे, हे सर्वात मोठे आव्हान शिंदे यांच्यासमोर आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले होते. त्यामुळे किमान तेवढे तरी आमदार परत निवडून आणण्याचे दुसरे आव्हान शिंदे यांच्यासमोर आहे. जर ४० आमदार निवडून आणले, तर शिंदे यांची मुख्यमंत्रिपदाची खुर्ची कायम राहील, असे आश्वासन भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने दिले असल्याचे बोलले जाते.

लोकसभेला काय झाले होते?

ही सर्व पार्श्वभूमी पाहता, शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या लढतीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या दोन्ही गटांचा १३ लोकसभा मतदारसंघांत एकमेकांशी सामना झाला. त्यापैकी शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाने सात आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाने सहा जागा जिंकल्या.

मुंबई महानगर क्षेत्रातील कामगिरीकडेही सर्वांचे लक्ष असेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघात त्यांचा सामना आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांच्याशी होणार आहे. तर, मुंबईतील वरळी येथे उद्धव ठाकरेंचा सामना शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे नेते व माजी खासदार मिलिंद देवरा यांच्याशी होईल. तसेच वरळीतच मनसेकडून संदीप देशपांडेही रिंगणात उतरले आहेत. वरळीच्या बाजूलाच असलेल्या माहीम विधानसभेत राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे निवडणूक लढवीत आहेत. त्यांच्याविरोधात, तसेच शिंदे गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर आणि ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत एकमेकांच्या विरोधात उभे आहेत.

लोकसभा निवडणुकीत एकनाथ शिंदेंना मुंबईतील तीनपैकी केवळ एका मतदारसंघात विजय मिळविता आला होता. तर, उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेने दक्षिण आणि दक्षिण मध्य मुंबईत विजय मिळविला. तसेच उत्तर पूर्व मुंबई लोकसभेत शिंदे गटाने केवळ ४८ मतांनी विजय मिळविला होता. मुंबईमध्ये स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी शिंदे गटाला अजूनही आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**कोकणातही अटीतटीची लढाई**

शिवसेनेसाठी मुंबई महानगरनंतर कोकण विभाग सर्वात महत्त्वाचा मानला जातो. कोकण प्रदेशातील लोकसभेच्या सर्व म्हणजे पाच जागा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला गमवाव्या लागल्या होत्या.

**उत्तर महाराष्ट्र**

उत्तर महाराष्ट्रात पाचारो विधानसभा मतदारसंघातही अटीतटीची लढत होणार आहे. शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार किशोर पाटील यांच्याविरोधात ठाकरे गटाच्या वैशाली सूर्यवंशी लढत आहेत. मालेगाव येथे मंत्री दादा भुसे यांच्याविरोधात अद्वैय हिरे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

कोकणात यावेळी कुडाळमधील ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांच्याविरोधात नारायण राणे यांचे सुपुत्र नीलेश राणे शिंदे गटाकडून निवडणुकीला उभे आहेत. तर, रत्नागिरी जिल्ह्यात उदय सामंत आणि त्यांचे भाऊ किरण सामंत हे रत्नागिरी आणि राजापूर मतदारसंघातून अनुक्रमे बाळ माने आणि राजन साळवी यांच्याविरोधात निवडणुकीला उतरले आहेत. तर, सावंतवाडीमध्ये राज्याचे मंत्री दीपक केसरकर यांच्याविरोधात शिवसेना ठाकरे गटाकडून राजन तेली निवडणूक लढविणार आहेत.

**मराठवाडा**

मराठवाड्यातही शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार, संजय शिरसाट, तानाजी सावंत व संतोष बांगर यांच्याविरोधात या ठिकाणी उबाठा गटाचे उमेदवार उभे आहेत. तसेच विदर्भात मंत्री संजय राठोड यांच्याविरोधात ठाकरे गटाचे पवन जैस्वाल मैदानात उतरतील.

## नंदुरबारमध्ये भरधाव वाहनाने ५ जणांना चिरडले



नंदुरबार (प्रतिनिधी) भरधाव वेगात असणाऱ्या बोलेरो वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असेल्या ३ दुचाकींना चिरडले. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे. २ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात नंदुरबार तालुक्यातील पिंपळोद गावाजवळ घडला. घडला. चालकाचा वाहनावरून ताबा सुटल्याने अपघात घडल्याची माहिती समोर येत आहे. जखमींना उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अपघातात चार चाकी वाहनांसह मोटरसायकलींचा जागीच चुरडा झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, २ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर लोय पिंपळोद गावाजवळ हा अपघात घडला. एक मोटारसायकल नादुरुस्त होती. अंधार असल्याने दुचाकी दुरूस्तीसाठी इतर दोन दुचाकी घटनास्थळी आल्या होत्या. त्यावेळी नंदुरबारकडून धानोराकडे एक बोलेरो भरधाव वेगात जात होती. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने त्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या तीन दुचाकीला चिरडले. त्यात ५ जणांचा मृत्यू झाला.

या अपघातात योगेश कालूसिंग नाईक, राहुल धर्मेंद्र वळवी, अनिल सोन्या मोरे, चेतन सुनील नाईक, श्रीकृष्ण लालसिंग ठाकरे यांचा मृत्यू झाला. तीन दुचाकींना ठोकरल्यानंतर बोलेरो गाडीही उलटली. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला आहे. त्याला नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ऐन दिवाळीतच या गावावर शोककळा पसरली. घटनेची माहिती मिळताच जिल्हा रुग्णालय परिसरात नातेवाईकांनी गर्दी केली. त्यांच्या आक्रोशाने अनेकांची मनं हेलावली.

## बहुजन विकास आघाडी पुन्हा अडचणीत !

पालघर :- बहुजन विकास आघाडीचे शिट्टी निशाणी इतर पक्षाला देण्यात आल्याने बहुजन विकास आघाडी पक्षाच्या अडचणीत वाढ झाली आहे. पालघर जिल्ह्यात बहुजन विकास आघाडीची सर्वश्रूत निशाणी शिट्टी पुन्हा एकदा पळवण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकींसाठी शिट्टी ही निशाणी जनता दल-युनायटेड या पक्षासाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना निवडणूक आयोगाने दिले आहेत. बहुजन विकास आघाडीसह इतर नोंदणीकृत राजकीय पक्ष तसेच अपक्षांना शिट्टी या निशाणीचा वापर करता येणे यामुळे अवघड झाले आहे. पालघर जिल्ह्यात बहुजन विकास आघाडीची शिट्टी ही निशाणी सर्वांनाच परिचित आहे. मात्र शिट्टी निशाणी मिळेल की नाही याबाबत साशंकता असून बहुजन विकास आघाडी पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे.

## जळगाव प्रांत कार्यालयात लाच घेऊन सेवावर्ग?

### प्रांतअधिकारी गोसावींवर गंभीर आरोप

### दीपक कुमार गुप्ता यांची विभागीय आयुक्तांकडे तक्रार

नंदलाल मराठे

जळगाव दि.४- शासन नियम व आदेशाविरुद्ध नियमबाह्य प्रती नियुक्तीवर बदली करण्याबाबत जळगाव प्रांत अधिकारी विनय गोसावी यांच्याविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे.जळगाव येथील माहिती अधिकार कार्यकर्ते दीपककुमार पी. गुप्ता यांनी विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग यांना लेखी पत्रान्वये दि.३० रोजी तक्रार केली आहे.

श्री.गुप्ता यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, महसूल व वन विभाग मंत्रालयाने सर्व विभागीय महसूल आयुक्तांना दिलेल्या निर्देशांनुसार वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या 'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि



शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५' नुसारच कराव्यात असे स्पष्ट केले आहे. तसेच जिल्हाधिकारी, जळगाव यांनीही याबाबत आदेश दिले आहेत. असे असतानाही, जळगाव प्रांतअधिकारी विनय गोसावी यांनी तीन ग्रामविकास अधिकाऱ्यांची सेवावर्ग केली आहे. ही सेवावर्ग बेकायदेशीर असल्याचा आरोप गुप्ता यांनी केला आहे.

तक्रारीत असाही दावा करण्यात आला आहे की, श्री. गोसावी यांनी एका ग्रामविकास अधिकाऱ्याची सेवावर्ग करण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच घेतली आहे.श्री. गुप्ता यांनी विभागीय महसूल आयुक्तांकडे श्री. गोसावी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची बढती रोखण्याची विनंतीही केली आहे.

श्री. गुप्ता यांनी केलेल्या या गंभीर आरोपांमुळे जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.विभागीय महसूल आयुक्त या प्रकरणी कोणती कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याविषयी त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधला



तक्रारदार श्री दिपककुमार गुप्ता

असता ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.

विनय गोसावी हे सन २०१३ मध्ये नाशिकचे उपविभागीय दंडाधिकारी असताना जमीन व्यवहारात अनियमितता झाल्याच्या आरोपावरून त्यांना निलंबित करण्यात आले असल्याचेही समजते.

## गुटख्याची साठवणूक पोलीसांची कारवाई

जळगाव (प्रतिनिधी) :- शहरातील सिंधी कॉलनी परिसरात विनापरवाना अवैधपणे गुटख्याची साठवणूक करून त्याची विक्री करणाऱ्या एकावर एमआयडीसी पोलीसांनी शनिवारी २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कारवाई केली. त्याच्याकडून ३८ हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यात एकावर गुन्ह दाखल करण्यात आला आहे.

सिंधी कॉलनी परिसरात संशयित आरोपी संतोष हुकूमतमल राजपाल हा विनापरवाना अवैधपणे गुटख्याची साठवणूक करून त्याची विक्री करत असल्याची गोपनिय माहिती एमआयडीसी पोलीसांना मिळाली. त्यानुसार पोलीसांनी शनिवारी २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कारवाई करत संतोष राजपाल याच्यावर कारवाई केली. त्याच्याकडून ३८ हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.






## संपादकीय

### बंडोबांमुळे बंडाळी!

बंडखोरीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाची शकले उडाली आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एकूण ६ पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. सर्वाधिक पक्ष निवडणुकीत उभे असल्यामुळे जितके उमेदवार, तितकीच बंडखोरीही वाढीस लागली आहे. इमानेइतबारे अनेक वर्षे पक्षाची सेवा करणा–या निष्ठावंत कार्यकर्त्यांना तिकिट नाकारण्यात आल्याने राज्यातील बहुतेक मतदारसंघांत बंडखोरीचे पेव फुटले आहे. विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाची चर्चा शेवटच्या दिवसापर्यंत खेचून बंडखोरी रोखण्याचा प्रयत्न दोन्ही आघाड्यांच्या नेत्यांनी केला. तरीही महायुती व महाविकास आघाडीचे शंभरहून अधिक दखल घेण्याजोगे बंडखोर रिंगणात उतरले असून बंडाचे झेंडे खाली उतरवण्यासाठी नेत्यांची धावाधाव सुरू झाली आहे. युती किंवा आघाडीतून तिकिट मिळत नसल्याने विविध राजकीय पक्षांतील नाराजांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत बंडखोरी केली आहे. त्यामुळे बंडखोरीचा मोठा फटका सहन करावा लागणार असल्याने त्या ठिकाणची हक्काची सीट धोक्यात आल्याचे चित्र अनेक ठिकाणी आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असून दिवाळीच्या धामधुमीत नेत्यांना बंडखोरांच्या मिनतवा–या करत फिरावे लागणार आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीत हजार, पाचशे मते घेणा–या अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीचे चित्र बदलले होते.

त्यामुळे महाराष्ट्रात सर्वच छोट्या–मोठ्या बंडखोरांच्या नाकदु–या काढत नेत्यांना फिरावे लागणार आहे. राज्यातील २८८ मतदारसंघांत ७,९९५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्जांची छाननी शुक्रवारी पूर्ण झाली. सोमवारपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी झाल्याने सर्वत्र बंडाळी माजली आहे. बंडोबांना थंड करण्यासाठी पक्षश्रेष्ठींची कसरत सुरू आहे. बंडखोरांची समजूत काढताना त्यांना विधान परिषदेवर संधी तसेच महामंडळे किंवा पक्षांतर्गत बढती' देण्याचे गाजर दाखवण्यात येत आहे. या आश्वासनाला अथवा प्रलोभनाला न जुमानता काहींनी बंडखोरी कायम ठेवण्याचा इशारा दिल्यामुळे पक्षश्रेष्ठींची चिंता वाढली आहे. मुंबईसह विविध ठिकाणी महायुतीत मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झाली आहे. महाविकास आघाडीने कोणत्याही परिस्थितीत मैत्रीपूर्ण लढती करायच्या नाहीत असे ठरवले आहे. या संदर्भात काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेऊन चर्चा केली आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मतदारसंघात भाजपाच्याच राजेंद्र पिपाडा यांनी बंडखोरी केली.

त्यांनी बैलगाडीतून मिरवणूक काढत उमेदवारी अर्ज भरला होता. त्यांना विशेष विमान पाठवून शिर्डीहून मुंबईला आणून त्यांची समजूत काढण्यात आली. महाविकास आघाडीमधील ९० टक्के बंडखोरांना शांत करण्यात यश आल्याचा दावा शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. कोण कोणत्या पक्षाचा उमेदवार आणि कोण आपल्या भागातून लढतोय हे ओळखताना सर्वसामान्य नागरिकांच्या मेंदूचा पार भुगा उडणार यात शंका नाही. आघाडी आणि युतीमधील बंडखोरांनी विद्यमान आमदारांना आणि उमेदवारांना घाम फोडला आहे. पक्षीय उमेदवारांसाठी धोकादायक ठरू शकतात अशा बंडोबांचे बंड थंड करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित झाल्या आहेत. दिवाळीचे निमित्त साधून फराळाच्या निमित्ताने बंडोबांच्या घरी जाऊन त्यांची मनधरणी करण्याचा प्लॅन आखला जात आहे. अनेक बंडोबा माघार घेण्यास तयार नाहीत.

अनेकजण नेत्यांनाच आपली राजकीय ताकद दाखवण्याच्या प्रयत्नात आहेत. अडीच वर्षात बदललेली राजकीय समीकरणे यामुळे उमेदवारी मिळवण्यात निर्माण झालेली अडचण हीच बंडखोरी होण्यामागची प्रमुख कारणे आहेत. नगरसेवकपदाची निवडणूक असो वा खासदार–आमदारकीची, एकदा निवडून येण्याची प्रत्येक पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांची इच्छा असते. विधानसभेसाठी जाहीर झालेल्या उमेदवारयादीत आपले नाव नसल्याचे पाहून अनेक इच्छुकांनी बंडखोरीचे हत्यार उपसले आहे. वंचित बहुजन आघाडीसह छोट्या पक्षांनाही बंडखोरीचा फटका बसला आहे. शिवसेना व राष्ट्रवादीतील बंडानंतर उमेदवार व बंडखोरांची संख्या वाढली आहे. काँग्रेसच्या काही बंडखोरांनी आमची मनधरणी करू नका, अपक्ष म्हणून लढणारच असे नेतृत्वाच्या कानी घातल्याचे सांगण्यात येते.

महायुतीत मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झाली आहे. भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) उमेदवार काही मतदारसंघांत परस्परांच्या विरोधात रिंगणात आहेत. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती' असे गोंडस नाव देण्यात आले आहे. मतदारसंघ मित्र पक्षाला सोडल्याने आमचे राजकीय भवितव्य काय, असा सवाल बंडखोरांकडून केला जात आहे. विधानसभा निवडणुकीत अनेक उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले असले तरी काही मतदारसंघांत एकाच नावाचे अनेक उमेदवार असल्याने मतदारांमध्ये गोंधळ उडण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात सुरेश पांडुरंग बनकर (उद्धव ठाकरे गट), सुरेश पांडुरंग बनकर (अपक्ष) यांनी अर्ज दाखल केले आहेत. छ. संभाजीनगर पश्चिम विधानसभा मतदारसंघात राजू शिंदे (उद्धव ठाकरे), राजू शिंदे(अपक्ष) यांनी अर्ज दाखल केले आहेत. अमरावतीमध्ये यशोमती ठाकूर (काँग्रेस) यांच्या विरोधात राजेश वानखेडे नावाचे दोन उमेदवार उभे आहेत.

सांगली आणि तासगाव कवठेमहांकाळ या दोन मतदारसंघांतही अशीच स्थिती आहे. आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर मात करण्यासाठी ही शक्कल लढवण्यात आल्याचे बोलले जात आहे. अशा प्रकारची रणनीती आखल्याने मतांचे विभाजन होऊन प्रमुख उमेदवाराला फटका बसू शकतो. अशा प्रकारांमुळे राजकारणी सेवाभावी कमी पण सत्तालोभी जास्त असा जनतेचा समज झाल्यास त्यात गैर ते काय? मतदान देशविकासाची गुरुकिल्ली आहे. मत कोणाला द्यायचे हे आपल्या अंतरात्म्याच्या सल्ल्याने देशाच्या, मुलांच्या भवितव्यासाठी ठरविले जाते. म्हणून प्रत्येकाने त्यासाठी सतर्क असले पाहिजे. मतदान न करणे हा देशद्रोहच म्हटला पाहिजे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने शंभर टक्के मतदान करण्याचा ठाम निश्चय करावा आणि आपल्या लोकशाहीचा सन्मान करावा. तुमच्या एका अमूल्य मतात बंडोबांना थंड करण्याची आणि मुजोरवृत्तीची नशा उतरवण्याची शक्ती आहे हे लक्षात ठेवा.

# कौटुंबिक लढती!

महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची पहिली ४५ उमेदवारांची यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली. यात विद्यमान आमदारांसह नवीन चेह–यांना संधी देण्यात आली आहे. यात सर्वाधिक चर्चेच्या बारामती मतदारसंघात अजित पवार विरुद्ध त्यांचा पुतण्या युगेंद्र पवार (शरद पवार गट) अशी लढत होणार आहे. काका विरुद्ध पुतण्या ही कौटुंबिक लढत लक्षवेधी ठरणार यात शंका नाही. विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आणि मंगळवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाल्यापासून राज्यातील निवडणूक फिव्हर' खूपच वाढला आहे.



ज्या राजकीय पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत ते पाहता एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते, ती म्हणजे एकाच घरात विविध पक्षांकडून उमेदवारी मिळालेले(मिळवलेले) उमेदवार आहेत. म्हणजे कुणीही जिंकला तरी सत्ता आपल्याच घरात नांदणार चित भी मेरी, पट भी मेरा! भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे खासदार आहेत. त्यांचा पुत्र नितेश राणेला भाजपने कणकवली मतदारसंघातून आमदारकीचे तिकिट दिले आहे. दुसरा पुत्र निलेश राणेसुद्धा उमेदवारीसाठी इच्छुक होता परंतु भाजपने त्याला नाकारले होते. त्यामुळे निलेशने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची वाट धरली आणि कुडाळ मतदारसंघातून उमेदवारी मिळवली. नारायण राणे स्वत: खासदार, त्यांच्या एका मुलाला उमेदवारी मिळाली तरीही दुस–या मुलाला उमेदवारी मिळावी हा अट्टाहास कशासाठी? नारायण राणे यांचे अनेक विश्वासू कार्यकर्ते आहेत.

त्यापैकी एका कार्यकर्त्याला मोठे होण्याची संधी का नाकारण्यात आली? कार्यकर्ते केवळ नेत्यांचे आदेश पाळण्यासाठी आणि सतरंज्या उचलण्यासाठी आहेत काय? राजकीय पदे नेहमी आपल्याच घरात ठेवण्याचा अट्टाहास का? हे विश्वचि माझे घर' ऐवजी हे घरच माझे विश्व' ही प्रवृत्ती राजकीय नेत्यांमध्ये वरचेवर बळावत चालली आहे. माजी मंत्री गणेश नाईक यांना भाजपने ऐरोली मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांचे पुत्र संदीप नाईक यांनाही उमेदवारी हवी होती परंतु ती देण्यास भाजपने असमर्थता दाखवली तेव्हा संदीप नाईक यांनी थेट शरद पवार गटात प्रवेश करत तुतारी हाती घेतली. म्हणजे एकाच कुटुंबात सत्ता कशी राहील हेच राजकीय घराण्यांकडून सातत्याने बघितले जाते. महाराष्ट्रातील नव्हे देशातील राजकारण केवळ काही घराण्यांपुरते सीमित असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थात ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने सर्वसामान्य घरातील कार्यकर्त्यांना सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष अशी पदे मिळत आहेत.

मात्र, त्यांच्यासाठी अजूनही विधानसभा आणि लोकसभेची दारे उघडल्याचे दिसून येत नाही. खरे पाहता सत्ता ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. वंचित समाज घटकातील नेते जेव्हा या देशाच्या सत्ताकारणाच्या पटलावर जातील तेव्हाच ते आपल्या शोषित–पीडित समाजाच्या वेदना जाणून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतील. महाराष्ट्रात घराणेशाहीचे राजकारण सातत्याने सुरू आहे. काही दशकांपूर्वी म्हणजे १९६० ते ८०च्या दशकापर्यंत पक्षाकडून सर्वसामान्य आणि काम करणा–या कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली जायची. मात्र, सर्वसामान्य कार्यकर्त्याला एकदा का संधी दिली की, तो देखील प्रस्थापित नेता बनू लागला आणि त्याचे पाय जमिनीवर राहिनासे झाले! याचे उदाहरण म्हणजे खासदार निलेश लंके! ते खासदार झाल्यानंतर पारनेर मतदारसंघात सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देण्याऐवजी त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी देण्यात आली.

यावरून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा विचार केला जात नाही हेच खरे. जर सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली तर तो आपल्याला धोबीपछाड मारेल अशी भीती या नेत्यांना वाटत असावी. त्यामुळे सर्व पदे आपल्या भोवतीच ठेवण्याचा या नेत्यांचा प्रयत्न असतो. विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर दलबदलूंचा, आयाराम–गयारामांचा सुळसुळाट सुरू झाला. ती प्रवृत्ती वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे एकदा राजकारणात प्रवेश केल्यानंतर आणि सत्तापदावर गेल्यानंतर त्या ठिकाणी कुटुंबशाही निर्माण करण्याची प्रवृत्ती! गत सात दशकांपासून हेच चालू आहे. भारतीय माणसाचे सरासरी आयुर्मान ७० वर्षांचे आहे परंतु राजकारणात ८० ते ९० ओलांडलेले नेतेही मोठ्या प्रमाणात आहेत. या नेत्यांची दुसरी–तिसरी पिढीही राजकारणात असून आपली कुटुंबशाही चालवते आहे. हे करताना कुटुंबशाहीमागचा मुख्य विचार म्हणजे सत्ता ही जातीबाहेर जाऊ नये आणि कुटुंबाबाहेरही जाऊ नये! कुटुंबशाहीला कोणताही पक्ष अपवाद नाही. सगळ्याच पक्षांमध्ये विद्यमान आमदार असताना आपल्याला तिकिट मिळत नसेल तर दुस–या पक्षात जाण्याची इच्छुकांची प्रवृत्ती वाढली आहे.

आता ही प्रवृत्तीच लोकशाहीच्या मुळावर उठलेली दिसते. अमुक पक्षात घराणेशाही आहे, कुटुंबशाही आहे असे एकमेकावर आरोप–प्रत्यारोप केले जातात. पण ही शाही' आटोक्यात आणण्याचा, संपवण्याचा प्रयत्न कोणीच करताना दिसत नाही. आता हे काम मतदारांनाच करावे लागेल. असो. सध्या महाराष्ट्र दिल्लीपुढे झुकत चालला आहे अशी चर्चा आहे. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या उमेदवारांची यादी दिल्लीत अंतिम होते असे गत काही दिवसांत दिसून आले आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी कितीही बैठका घेतल्या तरी दिल्लीतून अंतिम मंजुरी घ्यावी लागते. महायुतीची यादी अंतिम करावी यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्लीच्या किती वा–या केल्या याची गणना नाही. काँग्रेसची यादीही दिल्लीत बैठक झाल्यावरच निश्चित झाली. इतके सारे करूनही मविआ आणि महायुतीचे काही उमेदवार अजूनही जाहीर व्हायचेच आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख चार दिवसांवर आली असली तरी मविआ आणि महायुतीमधील अंतिम जागावाटप अजून झालेले नाही. काँग्रेसने आपली ४८ उमेदवारांची पहिली यादी गुरुवारी जाहीर केली. त्यात प्रस्थापितांवर भर देण्यात आला असून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, यशोमती ठाकूर, विश्वजीत कदम, नितीन राऊत, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे दोन्ही सुपुत्र अमित आणि धिरज देशमुख यांचा समावेश आहे. ■

# ड्रॅगनच्या पंखांना बलुची लगाम

चीनने अलीकडे पाकिस्तानमध्ये ग्वादर या बलुचिस्तानातील मोक्याच्या ठिकाणी २ हजार कोटी डॉलर्सचा चुराडा करून नवे विमानतळ उभारले आहे. शांघाय को–ऑपरेशन ऑर्गनायझेशन म्हणजे शांघाय सहकार परिषद या संघटनेच्या बैठकीसाठी १५ व १६ ऑक्टोबर रोजी चीनचे पंतप्रधान ली हे इस्लामाबादेत दाखल झाले असताना त्यांच्या हस्ते या विमानतळाचे आभासी उद्घाटन करण्यात आले. सणात पाहुणा' या न्यायाने चीनने हा घाट घातला. १४ ऑगस्टला होऊ घातलेला उद्घाटन सोहळा का लांबणीवर पडला? त्यामागे कोणती कारणे आहेत? भूराजनैतिकदृष्टीने चीनने जे मिळविले ते त्याला टिकविता येईल काय? पाकच्या नाकात दोरी बांधणाऱ्या बलुची बंडखोरांचे आव्हान पाकिस्तानला का पेलवत नाही? असे अनेक प्रश्न उभे राहतात.



ग्वादर विमानतळाचा इतिहास १९५८ पासून जुना आहे. पाकिस्तान सरकारने ग्वादर मस्कतच्या सुलतानाकडून विकत घेतले आणि १९५६ मध्ये त्याच्या विकासाला प्रारंभ केला. कराची ते मस्कत ग्वादरमार्गे फोकर एफ२७ विमानांची उड्डाणेही सुरू झाली. पुढे नव्या टर्मिनल इमारतीचे उद्घाटन १९८४ मध्ये करण्यात आले. प्रामुख्याने ग्वादरमध्ये राहणाऱ्या लोकांना ही विमानसेवा उपलब्ध झाली. २००८ मध्ये तेथे महत्त्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामगृहे व अन्य सुविधा उभारण्यात आल्या. २०१४ मध्ये उच्च प्राथमिकता म्हणून विमानतळाच्या उभारणीस प्रारंभ झाला. २९ मार्च २०१९ रोजी माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी एनजीआयएची पायाभरणी केली होती. या विमानतळाची प्राथमिक हाताळणी क्षमता ३० हजार टन एवढी होती.

तसेच त्यामध्ये मालवाहतूक, नाशवंत गोष्टींची वाहतूक यासाठीही योजना होती. एअरबस ए३८०, बोइंग ७४७ सारख्या विमानांची वाहतूकही या विमानतळावर होऊ शकेल एवढी व्यापक व्यवस्था करण्यात आली आहे. १ ऑगस्ट २०२३ रोजी नॅशनल असेंब्लीने ठराव करून विमानतळाचे नाव फिरोज खान नून विमानतळ असे ठेवण्याचा निर्णय घेतला आणि प्रादेशिक विधानसभेनेसुद्धा त्याला अनुमती दिली. ग्वादर सुरक्षित करण्यासाठी ओमानच्या सुलतानाबरोबरही करार करण्यात आला आहे.

नियोजित प्रकल्पातील ग्वादर विमानतळ म्हणजे पाकिस्तान–चीन इकॉनॉमिक कॉरिडॉरचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. पाकिस्तानच्या पाठीवर बसून चिनी ड्रॅगनला दक्षिण आशिया भागात धुडगूस घालावयाचा आहे. त्यासाठी हे विमानतळ म्हणजे त्याचे हेलीपॅड बनणार आहे. चीनने त्यासाठी पाकिस्तानला निधी दिला, मनुष्यबळ दिले, तंत्रज्ञान दिले आणि आपल्या आर्थिक धनाची दोरीही ढिली सोडली. पाकिस्तानच्या स्वातंत्र्य दिनी म्हणजे १४ ऑगस्ट रोजी या विमानतळाचे उद्घाटन होणार होते. पण माशी शिंकली. खुद्द पंतप्रधान शाहबाज शरीफ हे चिनी अधिकारी व्यक्तींसमवेत या विमानतळाचा प्रारंभ करून मोठेपणा मिरविणार होते.

पण बलुची बंडखोरांच्या प्रतापामुळे हे उद्घाटन तेव्हा पुढे ढकलण्यात आले होते. चिनी ड्रॅगनच्या साम्राज्यवादी पंखांना अशाप्रकारे बलुची बंडखोरांनी लगाम घातला एवढे मात्र खरे. इस्लामाबाद, कराची, लाहोर, पेशावर या शहरात पाकिस्तानात जी काही विमानतळे आहेत त्यापेक्षा आता चीनच्या मदतीने उभारलेले ग्वादर हे सर्वात मोठे विमानतळ असणार आहे. त्याचा उपयोग नागरी वाहतुकीप्रमाणे लष्करी संरक्षणाच्यादृष्टीने हालचाली करण्यासाठी होऊ शकेल.

लाल ड्रॅगन सरकार आणि पाकिस्तानी सरकार यांच्यात २०१५ मध्ये या संभाव्य विमानतळासाठी करार झाला. २०१९ मध्ये त्या कामाचा आरंभ झाला होता. आता २०२४ मध्ये ५ वर्षांनी हेच काम मार्गी लागले व पूर्ण झाले. अमेरिकेच्या मोठ्या एअरबससारखी प्रचंड विमानेही या विमानतळावर उतरू शकतील. चीनने पाकिस्तानप्रमाणेच नेपाळ, श्रीलंका, कंबोडिया, झिम्बाब्वे या देशांतही अशी मोठी विमानतळे उभारण्याचा घाट घातला आहे.

चिनी ड्रॅगनचे खाण्याचे आणि दाखविण्याचे दात भिन्न असतात. चीनला पाकिस्तानच्या प्रेमाचा उमाळा का आला आहे? कारण कर्जे देऊन, खूश करून पाकिस्तानला दबावाखाली ठेवण्याची चीनची भूमिका आहे. याच ग्वादर परिसरात चीनने एक बंदरही उभारले आहे. त्यामुळे अरबी समुद्रात चीनला पाकिस्तानच्या पाठीवर बसून मुक्त संचार करता येईल. तेथून त्याला मलाक्का म्हणजे आग्नेय आशियातील मलेशियाच्या सामुद्रधुनीपर्यंत संपर्क करता येईल. तेथील व्यापारावर ताबा मिळविण्याचा हा ड्रॅगनचा कावा आहे. हे बंदर चीनच्या शेनयांग प्रांतानजीक वसलेले आहे. त्यामुळे चीनला व्यापारीदृष्टीने आग्नेय आशियावर प्रभुत्व गाजविणे शक्य होईल.पण यामध्ये बलुची बंडखोरांचे आव्हान बिकट बनले आहे.

बलुची बंडखोरांच्या कारवायांमुळे पाकिस्तानच्या डोक्यावर अस्थिरतेची सतत टांगती तलवार आहे. गेल्या काही महिन्यांपासून बलुचिस्तानातील बंडखोरांनी एकानंतर एक धमाके सुरू केले आहेत. बसमध्ये प्रवाशांना उतरवून झालेला हत्येचा प्रसंग, त्यानंतर दोन वेळा झालेले मोठे बॉम्ब हल्ले या सर्व परिस्थितीतून मार्ग कसा काढावयाचा याची मोठी चिंता पाकिस्तानला आहे.

बलुचिस्तान नॅशनल आर्मी (बीएनए) या फुटीरतावादी संघटनेने स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी केली आहे व त्यांना शेकडो बलुची लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा आहे. चीन बलुचिस्तानमध्ये घुसून आपल्या नैसर्गिक साधनसामग्रीचे शोषण करीत आहे व पाकिस्तान त्याला मोकळे रान देत आहे, याचे दुःख बलुची लोकांना वाटणे साहजिक आहे. बलुचिस्तान हा पाकमधील सर्वात मोठा भूप्रदेश आहे. तेथे तेल, नैसर्गिक वायू, सोने, चांदी व कोळशाच्या खाणी आहेत. चीनचा या सर्व सामग्रीवर डोळा आहे. उलटपक्षी, स्थानिक बलुची लोकांना सर्व विकास प्रकल्पांपासून कटाक्षाने दूर ठेवले आहे. त्यांच्याच भूमीवर हे विमानतळ झाले पण तेथे बलुची लोकांना साधा प्रवेशही दिला जात नाही.

स्थानिक लोकांना विकासापासून वंचित ठेवून विमानतळ बंदराचा विकास आणि खाण संशोधन यासारख्या प्रकल्पांचा आम्हाला काय फायदा? असा प्रश्न स्थानिक बलुची तरुण विचारीत आहेत. म्हणून बलुची संघटनांमध्ये पाकिस्तान व चीनविषयी असंतोष आहे. खास करून चीन हा आपल्या मातृभूमीचे शोषण करण्यासाठी आला आहे, आम्हाला गुलामगिरीत ढकलणार आहे, शत्रूचा मित्र तो आमचा शत्रू या न्यायाने बलुची लोक चिनी ड्रॅगनकडे पाहात आहेत.

भविष्यकाळात चीन बलुचिस्तानला ओरबाडून काढील आणि त्याचा पुढील १०० वर्षात फक्त सापळा उरेल या भीतीने बलुची तरुण वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. त्यामुळे चिनी अभियंते, कामगार, कुशल मनुष्यबळ यावर एकानंतर एक हल्ले करून बलुची संघटना थरकाप उडवून देत आहेत. चीनला बलुचिस्तानातून संभाव्य विस्तारापासून रोखणे हा बीएनएचा अंतिम हेतू आहे. चिनी ड्रॅगनचा वसाहतवाद पाकिस्तानच्या लक्षात आला नाही. परंतु तो बलुची तरुणांच्या लक्षात आला. त्यांना आपली नैसर्गिक साधनसामग्री चीनपासून सुरक्षित ठेवायची आहे.

भविष्यात बलुचिस्तानकडे असेच दुर्लक्ष झाले तर तेथील तरुण वर्ग पाक व चीनचे कवच झुगारून देऊन स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल करू लागतील. चिनी ड्रॅगनच्या वन बेल्ट वन रोड' या पुढाकाराला अनेक देश कंटाळले आहेत. त्यापैकी बलुची लोक हेही आहेत. चिनी ड्रॅगनच्या उड्डाण पंखांना बलुची संघटनांनी तूर्त तरी चांगलाच लगाम घातला आहे असे म्हणता येईल. ■

# तुमचं इस्टाग्रामचे अकाउंट हॅक होऊ नये म्हणून काय करावे?

सोशल मीडिया प खर्पीरसीरा' हे आपल्या मित्र, कुटुंब आणि नातेवाईकांना जोडण्यासाठी खूप उपयुक्त आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात, सोशल मीडिया प खर्पीरसीरा'च्या मदतीने, प्रत्येकजण एकमेकांच्या अपडेट ठेऊन जागरूक राहतात.

या सगळ्यामध्ये इंस्टाग्राम काही लोकांसाठी धोकादायकही ठरले आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सोशल मीडिया अकाऊंटच्या माध्यमातून लोकांच्या हालचालींचा मागोवा घेतात असे अनेकदा दिसून आले आहे. जे खूप धोकादायक आहे. जर तुम्हालाही अशा लोकांपासून दूर राहायचे असेल तर येथे काही टिप्स आहेत ज्या तुम्ही नक्की पॉलो कराव्यात.

इंस्टाग्रामने यूजर्सच्या सुरक्षेसाठी अनेक फीचर्स दिले आहेत, ज्यामध्ये अकाउंट प्रायव्हेट करणे देखील समाविष्ट आहे. तुम्ही हे सक्रिय केल्यावर, तुमचा अनुयायी नसलेला कोणीही तुमच्या खात्यावर पोस्ट केलेली माहिती मिळू शकते.



मेटा ही फेसबुक आणि इंस्टाग्रामची मूळ कंपनी आहे. या कारणास्तव, मेटा फेसबुक आणि इंस्टाग्रामला लिंक करण्याची परवानगी देते. तुम्ही फेसबुकवर काही पोस्ट केल्यास ते इन्स्टाग्रामवर शेअर केले जाते आणि इन्स्टाग्रामवर काही पोस्ट केले तर ते आपोआप फेसबुकवर शेअर केले जाते.

फेसबुक आणि इंस्टाग्रामवर वेगवेगळ्या सर्कलमधील लोक तुमच्यासोबत जोडले जातात, अशा परिस्थितीत तुम्ही दोन्ही अकाउंटच्या पोस्ट शेअर करण्याचा पर्याय बंद केल्यास तुमच्या क्टिव्हिटीचा मागोवा घेणे कठीण होऊन बसते.

इंस्टाग्राम तुम्हाला जवळच्या मित्रांची यादी तयार करण्यास अनुमती देते. या फीचरमध्ये, तुम्ही तुमच्या पोस्ट फक्त काही लोकांना दाखवण्यासाठी जवळच्या मित्रांची यादी तयार करू शकता, ज्यानंतर तुम्ही ओळखत नसलेले लोक तुमच्या पोस्ट आणि माहिती पाहू आणि ट्रॅक करू शकणार नाहीत.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स,जुनी एमआयडीसी, जळगाव – ४२५००१ येथे छापून शॉप नं.ई/१२, चौथा मजला गोलाणी मार्केट, जळगाव–४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी* संपादक: नंदलाल मराठे (९१७५९९६२३२) Email-dainikshauryamarathigmail.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही (RNI-MAHMAR/2023/89125)

# गुलाबराव पाटील विकास कामांच्या दमावर विजयी पताका फडकवतील

## लोक समर्थन हेच माझे बळ – गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन

जळगाव(प्रतिनिधी)-शिवसेनेचे नेते तथा महायुतीचे उमेदवार गुलाबराव पाटील हे विकास कामांच्या दमावर विजयी पताका फडकवतील असा दृढ विश्वास जळगाव ग्रामीण विधानसभा मतदार संघात कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.गुलाबराव पाटील यांनी राजकीय जीवन जनतेच्या सेवेसाठी अर्पण केले असून त्यांच्या कार्यात लोकांच्या कल्याणाची भावना कायम अग्रस्थानी आहे. त्यामुळे जनता त्यांना कदापी पराभव पत्करू देणार नाही.त्यांच्या दररोजच्या भव्य रॅल्यांमध्ये स्वयंपूर्तीने कार्यकर्ते दिसून येत आहे. चिंचोली, धानवड,उमाळा,कंडारी,देव्हारी,कुसुंबा भागात गुलाबभाऊंचा विकास बोलतोय अशी भावना आम जनतेमधून उमटत आहे. दररोजच्या भव्य रॅल्यांमध्ये मला मिळत असलेला जनतेचा प्रचंड प्रतिसाद आणि भक्कम समर्थन हेच माझे खरे बळ



असल्याचे प्रतिपादन गुलाबराव पाटील यांनी जनतेशी संवाद साधतांना केले. यावेळी माजी महापौर ललित कोल्हे, जिल्हाध्यक्ष ह.भ.प. जळकेकर महाराज, सेनेचे जिल्हा प्रमुख निलेश पाटील, सरिताताई कोल्हे - माळी, जि.प. चे उपाध्यक्ष लालचंद पाटील उपस्थित होते.

कुसुंबा व परिसरात भव्य रॅलीनंतर चौका - चौकांमध्ये मध्ये ग्रामस्थांशी गुलाबराव पाटील यांनी संवाद साधला असता प्रत्येक चौकात गुलाबभाऊ आम्ही तुमच्या सोबत' असून -सुरेशदादा नगरसह कुसुंबा वासीय तुमच्या पाठीशी खंबीर पणे उभे आहोत. अशी हमी दिली.चिंचोली, धानवड, आणि कुसुंबा परिसरात गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकासाचे प्रत्यक्ष परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत. रस्ते सुधारणा, पुलांचे काम, पाणी पुरवठा योजना, बेघरांना कायमस्वरूपी जागा देवून शेकडोंचा घरकुल प्रश्न मार्गी लावला आणि शेतकऱ्यांसाठी ट्रान्सफार्मर, विविध सोयी-सुविधा यांमध्ये झालेला बदल हा त्या विकासाचा जिवंत पुरावा असून गुलाब भाउंचा विकास कार्यातला संकल्प लोकांपर्यंत पोहोचतोय. त्यांचे असलेले कट्टर समर्थक, लोकांच्या डोळ्यातला आदर आणि आशीर्वाद यामुळेच गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाला एक विशेष स्थैर्य मिळाल्याने असा नेते होणे नाही ही भावना जन सामन्यात दिसून आली.

या परिसरात निघालेल्या भव्य रॅल्यांमध्ये सेनेचे शिवराज पाटील, अनिल भोळे, देविदास कोळी, विजय लाड, भाजपाचे हर्षल चौधरी, मनोहर पाटील, रघुनाथ चव्हाण, नाना वाघ, गोकुळ महाजन, मयूर महाजन संजय घुगे, जितु घुगे, अतुल घुगे,मनोज घुगे, मिलिंद लाड , जितु पोळ, ब्रिजलाल पाटील, संभाजी पवार, राजू पाटील, शिवा मांडे, विलास घुगे, शिवाजी मांडे, संदीप बिर्हाडे, योगेश सोनावणे, सुनील लाड, संदीप लाड, नंदूआबा पाटील, बबलू पाटील,प्रवीण पाटील,सरपंच यमुनाबाई ठाकरे, भारतीताई पाटील, निलेश ठाकरे, आकाश पाटील, भूषण पाटील, ज्योतीताई पोळ, ज्योतीताई शिवदे, अंकुश मोरे,कैलास कोळी, चंद्रकांत पाटील,फिरोज तडवी,विजय पाटील, मगन पाटील,रायपूर येथील सरपंच रजनीताई सपकाळे, प्रवीण परदेशी, सिताराम परदेशी, राजेंद्र परदेशी पुष्पाबाई परदेशी, चेतन परदेशी यांच्यासह परिसरातील सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते व महिलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेचक

### चोपडा विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांचा झंझावात हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने मोहिदा येथून प्रचाराचा शुभारंभ



चोपडा (प्रतिनिधी)- चोपडा विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार माजी आमदार प्रा.चंद्रकांत बळीराम सोनवणे यांचा प्रचाराचा झंझावात सुरू झालाअसून, हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने मोहिदा येथून या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.दि.२ रोजी मोहीदा येथील श्री दत्त मंदीर येथे प्रचारार्थ नारळ वाढवून हजारो कार्यकर्त्यांच्या समवेत प्रचार कार्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आमदार सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे,उमेदवार प्रा.चंद्रकांत सोनवणे, जिल्हा बँकेचे संचालक घनश्यामभाऊ अग्रवाल,कृउबा सभापती नरेंद्र पाटील,एम व्ही पाटील उपसभापती,माजी जि.प.सदस्या सौ.उज्वल्ला म्हाळके यांचे पती प्रशांतभाऊ आत्माराम म्हाळके (विरवाडे),माजी गटविकास अधिकारी भरत कोसोदे,माजी उपनगराध्यक्ष विकास पाटील,गोपाल चौधरी यांच्यासह मोहीदा, अंजतिसिम, वढोदा, विटनेर, वाळकी,शेंदणी, मालखेडा आदी गावातील ग्रामस्थ,शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक ०४/११/२०२४ सोमवार रोजीचा प्रचार दौरा १) मजरे व मोजे हिंगोणे - सकाळी ०८:०० वाजता. २) काजीपुरा - सकाळी ०८:३० वाजता. ३) गलवाडे - सकाळी ०९:०० वाजता. ४) हातेड बु.- सकाळी ०९:३० वाजता. ५) हातेड खु.- सकाळी १०. ०० वाजता. ६) भाईू :- सकाळी १०:३० वाजता. ०७) विचखेडा :- सकाळी ११:३० वाजता. ०८) धुपे खु. :- दुपारी १२:०० वाजता. ०९) धुपे बु. :- दुपारी १२:३० वाजता. १०) अनवर्दे खु. :- दुपारी ०१:०० वाजता. ११) बुधगांव :- दुपारी ०१:३० वाजता. विश्रांती १२) दगडी :- दुपारी ०२:३० वाजता. १३) अनवर्दे बु. :- दुपारी ०३: ०० वाजता. १४) कुसुंबा :- दुपारी ०३:३० वाजता. १५) घोडगांव :- दुपारी ०४:०० वाजता. १६) वेळोदा :- दुपारी ०४:३० वाजता. १७) गलंगी :- संध्याकाळी ०५:०० वाजता. १८) अकूलखेडा :- संध्याकाळी ०५:३० वाजता.

### मतदार यादी पडताळणीदरम्यान मारहाण करून तरुणांवर पिस्तूल रोखले

चाळीसगाव (प्रतिनिधी) :- मतदार यादी पडताळणी दरम्यान काही इसमांनी तरुणांना मारहाण करून पिस्तूल दाखवत जीवे ठार मारण्याचे धमकी दिली. याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून पिस्तूल जप्त करण्यात आली आहे.

शहरात भोई गल्ली घाटरोड परिसरात मतदार यादी पडताळणीचे काम सुरू होते. जय दिलीप चौधरी, निखील पवार व विष्णु चौधरी हे मतदार यादी पडताळणी करीत असताना दरम्यान किरण घोरपडे अन्य दोन अनोळखी व्यक्ती तेथे आल्या. त्यांच्यात बाचीबाची होउन किरण घोरपडे व अनोळखी व्यक्तींनी जय दिलीप चौधरी, निखील पवार व विष्णु चौधरी यांना मारहाण केली. तसेच जय दिलीप चौधरी, याचे नातेवाईक तेथे आले असता किरण घोरपडे याने खिशातून पिस्तूलने गोळी झाडण्याची धमकी दिली. दरम्यान, धक्काबुक्कीत पिस्तूल खाली पडले व अंधाराचा फायदा घेत संशयित व दोन अनोळखी व्यक्ती तेथून पसार झाले. यावरून चाळीसगाव शहर पोलिस ठाण्यात संशयित किरण घोरपडे अन्य दोन साथीदारांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून पिस्तूल व जीवंत काडतूस पोलीसांकडून जप्त करण्यात आले आहे. फरार संशयितांनाचा पोलीस शोध घेत असून पुढील तपास पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली पीएसआय गणेश सायकर करीत आहेत.

### धरणगावात शेकडो कार्यकर्त्यांनी केला शिवसेनेत प्रवेश

जळगाव (प्रतिनिधी) :- राज्यात विधानसभा निवडणुकीत जळगाव ग्रामीण मतदार संघातील धरणगाव येथील वैदु समाजाचे प्रमुख शिवदास वैदू व मंत्री गुलाबराव पाटील व त्यांचे खंदे समर्थक पापा वाघरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दि. १ नोव्हेंबर रोजी शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. ना.गुलाबराव पाटील यांनी शहरात भरघोस विकास कामे केली त्याचबरोबर राजकारण न करता सर्व स्तरातील लोकांना बरोबर घेऊन काम करण्याची कार्यपध्दती बघता हा पक्ष प्रवेश केला असे शिवदास वैदू यांनी सांगितले.

त्यांना युवा नेते जि प सदस्य प्रतापराव पाटील,उपजिल्हा प्रमुख माजी नगराध्यक्ष पी एम पाटील,शहरप्रमुख विलास महाजन यांनी प्रवेश दिला. या प्रसंगी शिवसेनेत प्रवेश करणारे जितू चव्हाण, बाबा पचेरवार,पृथ्वी पचेरवार, पवन पचेरवार, भैय्या गुरु वैदु,गुरु बिच्छा वैदु,मच्छिंद्र वैदु,सुभाष लक्ष्मण सोनवणे,बिच्छा वैदु, मच्छिंद्र वैदू,नथू वैदु,तात्या वैदु, राजू तात्या वैदु,बापू लक्ष्मण वैदु,शिवदास लक्ष्मण सोनवणे, गुरु वैदु,तात्या दत्तू वैदु,संजू दत्तू वैदु,सुकलाल वैदु,राहुल वैदु,संजय वैदु,विशाल सोनवणे, गणेश वैदु,सुनील वैदु,अजय वैदु,सागर वैदु,रोहित वैदु,दीपक वैदु,सागर वैदु,सिकंदर वैदु,विनोद वैदु,सुनील वैदु,गणेश वैदु,राजू वैदु,दीपक वैदु,अजय वैदु,परशुराम वैदु,मुकेश सोनवणे, विजय सोनवणे,अनिल सोनवणे,विनोद वैदु,गुमा वैदु,विशाल वैदु,अशोक वैदु,राधे वैदु,अर्जुन वैदु,दशरथ सोनवणे,करण वैदु,विजय वैदु,सागर वैदु,गुड्ड्या वैदु,तात्या वैदु,गणेश वैदु,दीपक वैदु,राजेंद्र वैदु,दिगंबर वैदु,भिका वैदु,राजेंद्र वैदु,विशाल वैदु,निंबा वैदु,राहुल वैदु,भिकाजी वैदु,दुर्गाजी वैदु,अनिल वैदु,रामा वैदु यांनी शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना परिवाराचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चुंचाळे येथील माजी पं.स.सदस्य नंदलाल चौधरी यांचा दिग्गजांसह शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश

चोपडा(प्रतिनिधी)- तालुक्यातील चुंचाळे येथील माजी पं.स.सदस्य नंदलाल गोविंदा चौधरी यांनी दिग्गजांसह शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला.त्यांच्या या प्रवेशाने शिवसेनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे.चुंचाळे हे गाव मोठे असून या गावात राष्ट्रवादी,भाजप यांचे प्राबल्य होते.नंदलाल गोविंदा चौधरी हे गेले अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करीत होते ते सध्या शरद पवार गटात होते.अतिशय प्रामाणिक असा कार्यकर्ता म्हणून त्यांची संपूर्ण तालुक्यात ओळख असून त्यांचे गुर्जर समाजात मोठे नाव आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट



पक्षातून शिवसेनेत प्रवेश केल्याने प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे यांचा विजयात त्यांचा मोठा वाटा असणार आहे.

याप्रसंगी त्यांच्यासोबत त्यांच्या पुतण्या मयूर ज्ञानेश्वर चौधरी (चेअरमन श्री विठ्ठल वि.का. सहकारी सोसायटी चुंचाळे), सुनील पांडुरंग पाटील ( वि.का.सो.सदस्य), लिलाचंद आनंदा चौधरी ( दूध डेअरी चेअरमन ), नरेंद्र चौधरी, रवींद्र पाटील, दीपक कोळी, किशोर शिंपी, राजेंद्र चौधरी, सुरेश खैरनार, शैलेश चौधरी, प्रज्वल चौधरी आदींनी प्रवेश केला.

यावेळी घनश्याम भाऊ अग्रवाल, नरेंद्र पाटील ( सभापती कृ.ऊ.बा.स.), विकास पाटील, राजूभाऊ बिटवा, एम. व्ही. पाटील सर, गोपाल चौधरी, कैलास बाविस्कर, नाना छगन, संजय शिंदे, देविदास सोनवणे, सुखलाल कोळी, किरण देवराज उपस्थित होते.

## आ. राजूमामा भोळे यांनी सहकुटुंब घेतली माजी मंत्री सुरेशदादांची भेट



जळगाव (प्रतिनिधी) :- दीपोत्सवानिमित्त शुक्रवारी सकाळी १ नोव्हेंबर रोजी आ. राजूमामा उर्फ सुरेश भोळे यांनी सहकुटुंब माजी मंत्री सुरेशदादा जैन यांची भेट घेत आशीर्वाद घेतले.

आमदार भोळे यांनी पत्नी तथा माजी महापौर सीमा भोळे, मुलगा विशाल भोळे, सुन डॉ. जुही भोळे व मोहित भोळे यांच्यासह सुरेशदादा जैन यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

जळगाव शहरात सर्वांगिण विकास कसा झाला पाहिजे, शहर मतदारसंघातील कोणकोणत्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रीत केले पाहिजे, तसेच विविध विषयांवर वडिलधाऱ्या दादांनी आशीर्वादपर मार्गदर्शन दिले.

हा स्नेहबंध उद्याच्या जळगाव शहराच्या सर्वांगिण विकासासाठी अत्यंत मोलाचा आणि मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास आ. राजूमामा भोळे यांनी व्यक्त केला.

## चाळीसगावात महायुतीचे उमेदवार मंगेश चव्हाण यांनी केली 'चाय से' प्रचाराची सुरुवात

चाळीसगाव(प्रतिनिधी)- येथील विधानसभा मतदारसंघांचे महायुतीचे उमेदवार आ.मंगेश चव्हाण यांनी शनिवारी 'चाय से' प्रचाराची सुरुवात केली. शहरातील प्रसिद्ध फेमस टी हाऊस येथे भेट देऊन चहा पिऊन केली. या ठिकाणी चहा पिण्यास आलेल्या नागरिकांशी चर्चा करून महायुती उमेदवाराला विजयी करण्यासाठी आवाहन केले.

विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी दि. ४ नोव्हेंबर रोजी माघारीची अंतिम तारीख आहे. यानंतर दोन आठवडे प्रचार अजून जोर धरून वेग घेणार आहे. त्याआधी चाळीसगाव मतदारसंघांमध्ये भाजपाचे



उमेदवार आ. मंगेश चव्हाण हे मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आवाहन करीत त्यांचे म्हणणे ऐकून घेत आहे.

आ. मंगेश चव्हाण यांना तालुक्यातून प्रतिसाद मिळत असून विधानसभा निवडणुकीत आपल्या पाठीशी राहू असं नागरिक आमदार मंगेश चव्हाण यांना आश्वस्त करीत आहेत प्रचारामध्ये आ.मंगेश चव्हाण यांच्या पत्नी प्रतिभाताई चव्हाण या देखील सहभागी होत असून महिला वर्गाला सोबत घेऊन त्या मतदारांना साद घालीत आहेत.

## कोळी समाज बांधव जात प्रमाणत्रासाठी उपेक्षितच!

### आचारसंहिता आटोपताच पुन्हा तीव्र आंदोलन उभारणार-जगन्नाथ बाविस्कर

**महाराजस्वं अभियानअंतर्गत घराघरात दाखले पोहोचविणार..**

महाराष्ट्र शासनातर्फे महाराजस्वं अभियान व शासन आपल्या दारी ह्या योजनेअंतर्गत लाभार्थींना शिबिरांद्वारे सर्वच प्रकारचे दाखले पुरविण्यात येतात. परंतु आतापर्यंत ह्या योजनेअंतर्गत आदिवासी कोळी लोकांना जातप्रमाणपत्र देण्यात आलेले नाहीत. म्हणुनच पुढील काळात तीव्र आंदोलनाच्या माध्यमातून घराघरात दाखले पोहोचविणार आहोत.

**जगन्नाथ बाविस्कर तालुका संपर्कप्रमुख**
**आदिवासी कोळी जमात मंडळ, ता.चोपडा**



चोपडा (प्रतिनिधी)- चोपडा तालुका विधानसभा मतदारसंघ हा सन २००९ पासून अनुसूचित जमाती (एसटी) साठी राखीव करण्यात आलेला असून ह्या मतदारसंघात आदिवासी बहुल लोकसंख्येच्या एकूण ७० टक्के लोकसंख्या व मतदार संख्या ही एकट्या कोळी जमातीची आहे. तरीही येथील आदिवासी कोळी लोकांजवळ सबळ पुरावे असतांना टोकरेकोळी (अनु.जमाती) च्या जात प्रमाणपत्रांसाठी उपेक्षितच रहावे लागत आहे. सामा.कार्यकर्ते जगन्नाथ बाविस्कर यांनी मागील वर्षात अमळनेर व चोपडा प्रांत कार्यालयासमोर तसेच जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र अन्नत्याग सत्याग्रह करून कोळी लोकांना शेकडो दाखले मिळवुन दिलेले होते. परंतु आंदोलन उपोषण थांबले की, संबंधित अधिकारी राजकीय व प्रशासकीय दबाव असल्याचे सांगून दाखले देणे बंद करतात. यामुळे कोळी जमातीचे सामाजिकदृष्ट्या खूपच मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. हा मतदारसंघ गेल्या तीन पंचवार्षिक पासून व यापुढेही अनुसूचित जमातीसाठी राखीव असतांना जर सुलभपणे जातप्रमाणपत्र मिळत नसतील तर याचा काय उपयोग आहे ? याबाबत कोळी लोकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असुन सध्या सुरू असलेली विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता आटोपताच पुन्हा तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारणार असल्याचा इशारा आंदोलनकर्ते जगन्नाथ बाविस्कर (गोरगावले बुद्रुक) यांनी ह्या पत्रकांन्वये दिला आहे.

# किशोर पाटलांचा पराभव अटळ किंबहुना डिपॉझिट जप्त होईल

## जनतेची माफी मागून माघार घ्यावी – अपक्ष उमेदवार अमोल शिंदे यांचा सल्ला

पाचोरा(प्रतिनिधी)- पाचोरा विधानसभा मदारसंघातील महायुतीचे उमेदवार किशोर पाटलांचा पराभव अटळ असून किंबहुना त्यांची डीपॉझिट जप्त होईल, त्यामुळे त्यांनी माघारीच्या दिवशी जनतेची माफी मागून निवडणुकीच्या रिंगणातून माघार घ्यावी असा सल्ला अपक्ष उमेदवार अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांना दिला आहे.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पराभवाच्या भीतीने आमदार किशोर आप्पा पाटील यांनी अपक्ष उमेदवार अमोल पंडितराव शिंदे यांचे मत विभाजन करण्यासाठी अनैतिक खेळी खेळली आहे. अमोल शांताराम शिंदे नावाच्या व्यक्तीचा उमेदवारी अर्ज दाखल केला. नेहमीप्रमाणे धादांत खोटे बोलणाऱ्या आमदाराने आपल्यावरील हा आरोप फेटाळून लावला. मात्र नाव साधर्म्य असलेल्या उमेदवाराचा अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत आमदार पुत्रासह, नातेवाईक व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित असल्याचे पुरावे अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिले.

पाचोरा भडगाव विधानसभेचे अपक्ष उमेदवार अमोल पंडितराव शिंदे यांनी आज दिनांक ३ रोजी त्यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत बोलताना अमोल शिंदे म्हटले की, आमदार किशोर पाटील यांचा पराभव अटळ आहे. पराभूत मानसिकता त्यांना छळत आहे. त्यांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या काही मिनिटात माझे नाव साधर्म्य असलेल्या अमोल शांताराम शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र आपण असे केलेच नाही असा बनाव आमदारांनी पत्रकार परिषदेतून व्यक्त केला. यावर प्रति



आव्हान देण्यासाठी अमोल शिंदे यांनी ही पत्रकार परिषद आयोजित केली होती.

आमदार किशोर पाटील यांनी माझ्या या चार प्रश्नांचे उत्तर द्यावेत,असे प्रति आव्हान अमोल शिंदे यांनी यावेळी केले असून डमी उमेदवार अमोल शिंदे हे घुसर्डी ता. भडगाव येथील रहिवासी आहेत, त्यांच्या फॉर्मवर घुसर्डी किंवा भडगाव तालुक्यातील किंवा त्यांच्या परिचयातील नात्यातील व्यक्ती सूचक म्हणून त्यांना का मिळाला नाही?,त्यांच्या उमेदवारी अर्जावरील सूचक हे पाचोरा शिवसेनेचे पदाधिकारी आहेत. त्यातील काही आमदारांचे नातलग व पक्षाचे पदाधिकारी आहेत. याचे उत्तर आमदारांकडे आहे का?, डमी उमेदवार अमोल शिंदे यांचा उमेदवारी अर्ज भरताना त्यांच्यासोबत आमदाराचा स्वीय सहाय्यक राजू पाटील, आमदाराचा जवळचा नातलग समाधान, आमदाराचा शालक एकनाथ पाटील आणि वगैरे मंडळी आमदारांचा नव्हे तर मग, कोणाच्या आदेशाने त्याचा फॉर्म भरताना उपस्थित राहिले.? उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर डमी उमेदवार अमोल शांताराम शिंदे याला प्रांत ऑफिस मधून अज्ञातस्थळी रवाना करण्याची जबाबदारी स्वतः आमदार पुत्र सुमित किशोर पाटील यांनी आपल्या गाडीतून पार पडली. सामान्य व्यक्तीला प्रवेश नसलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात आमदार पुत्राच्या गाडीला त्यावेळी प्रवेश कसा मिळाला. यावर आमदारांनी जनतेला उत्तर द्यावे असे आवाहन अमोल पंडितराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

याबद्दल तपशीलवार बोलताना अमोल शिंदे म्हटले की, आमदार किशोर पाटील हे या निवडणुकीत अत्यंत खालच्या व हिन दर्जाचे राजकारण करीत आहेत. अत्यंत घाणेरड्या राजकीय मानसिकतेमुळे आमदार किशोर पाटील यांचे कडून माझ्या जीविताला धोका होऊ शकतो, किंवा माझ्यावर खालच्या दर्जाचे आरोप आमदार करू शकतात. अशा प्रकारची शक्यता अमोल शिंदे यांनी व्यक्त केली. असे असले तरी दोन्ही तालुक्यातून जनतेचा उदंड प्रतिसाद आणि माता भगिनींचा आशीर्वाद माझ्या पाठीशी असल्याने मोठ्या मताधिक्याने मी विजयी होईलच असा आत्मविश्वासही अमोल शिंदे यांनी या पत्रकार परिषदेत व्यक्त केला आहे.

## एक बहिण नसली म्हणून काय झाले, हजारो बहिणी किशोर आप्पांच्या पाठीशी उभ्या आहेत!



भडगाव (प्रतिनिधी)–एक बहिण नसली म्हणून काय झाले, हजारो बहिणी किशोर आप्पांच्या पाठीशी उभ्या आहेत असे आश्वासन देत महीला वर्ग मोठ्या प्रमाणात किशोर पाटील यांना पाठिंबा देत असल्याचे दिसून येत आहे. पाचोरा –भडगाव विधानसभा निवडणुकीत आमदार किशोर पाटील, माजी आमदार दिलीप वाघ, सौ.वैशाली सुर्यवंशी, अमोल शिंदे, डॉ. निळकंठ पाटील, प्रतापराव पाटील, सचिन सोमवंशी यांनी आपापल्या परीने प्रचार सुरु केला आहे.

या प्रचार मोहिमेत आमदार किशोर आप्पा पाटील यांची कन्या सौ. प्रियंका पाटील यांनी किशोर आप्पा पाटील यांच्या प्रचारार्थ गावागावात जाऊन घराघरात मतदारांच्या भेटी घेत आहेत.या भेटीदरम्यान सौ. प्रियंका पाटील या महिला तसेच मुलींना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत.त्या प्रत्येक महिला व मुलीं सोबत हितगुज करुन तुमच्या अडचणी काय आहेत. महिलांना आज कशाची गरज आहे. तरुण मुलींना तसेच शाळा कॉलेजमध्ये शिकत असलेल्या मुलींना कोणत्या समस्या आहेत हे जाणून घेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असून आप्पासाहेब आमदार झाले तर मी नक्कीच पहिल्यांदा तुम्हाला दिलेल्या शब्दांची आश्वासन पूर्ण करेल अशी ग्वाही देत आहेत.या प्रचार दौऱ्या दरम्यान सौ.प्रियंका पाटील यांचे घराघरांतून औक्षण करुन स्वागत केले जात आहे.तसेच एक बहिण नसली म्हणून काय झाले, हजारो बहिणी किशोर आप्पांच्या पाठीशी उभ्या आहेत असे आश्वासन महिला भगिनी यांनी दिले असल्याने आमदार किशोर आप्पा पाटील यांना महीला वर्गातून वाढता पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

## देवकर आप्पांना नोट भी... और वोट भी...

### धरणगाव तालुक्यातील बिलखेडा ग्रामस्थांनी दिली ५० हजाराची लोकवर्गणी!



धरणगाव (प्रतिनिधी)–विधानसभेच्या जळगाव ग्रामीण मतदारसंघात महाविकास आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून माजी मंत्री गुलाबराव देवकर यांना गावागावातील मतदारांकडून तन, मन आणि धनाने पाठिंबा मिळू लागला आहे. धनशक्ती विरूद्ध जनशक्तीच्या या लढ्यात धरणगाव तालुक्यातील बिलखेडा गावाने सुमारे ५० हजार रूपये लोकवर्गणी जमा केल्याने देवकर आप्पांना नोट भी... और वोट भी... अशी चर्चा सगळीकडे होत आहे.

माजी मंत्री गुलाबराव देवकर हे प्रस्थापितांना आव्हान देण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यापासून जळगाव तसेच धरणगाव तालुक्यातील सर्वच गाव खेड्यातून त्यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक गावात ढोल–ताशाच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. इतकेच नव्हे तर त्यांची चक्क घोड्यावरून मिरवणूक काढण्यात येत आहे. अनेक ठिकाणचे तरूण राष्ट्रवादीत प्रवेश करण्यासाठी रांगा लावत आहे. देवकरांना मिळत असलेला वाढता प्रतिसाद लक्षात घेता ग्रामीण मतदारसंघात आतापासूनच तुतारीचा आवाज घुमू लागला आहे. तरूणांसह महिला व पुरूष मतदारांनी त्यांची ही यंदाची विधानसभा निवडणूक स्वतःच्या ताब्यात घेतल्याचा प्रत्यय ठिकठिकाणी येत आहे. धरणगाव तालुक्यातील बिलखेडा सारख्या छोट्याशा खेड्याने तर मनाचा मोठेपणा दाखवून गुलाबराव देवकरांना आर्थिक मदत म्हणून सुमारे ५० हजार रूपये लोकवर्गणी जमा करून दिली आहे. ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे जमा केलेली मदत स्वीकारताना स्वतः गुलाबराव देवकर आणि त्यांच्या सोबतच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे डोळे पाणावल्याशिवाय राहिले नाही. धनशक्ती विरूद्ध जनशक्तीच्या या लढाईत बिलखेडा ग्रामस्थांकडून मिळालेल्या फुल ना फुलाची पाकळी' आर्थिक मदतीने माझ्या विजयाचा आत्मविश्वास आणखी वृद्धींगत झाला आहे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री देवकर यांनी दिली. याप्रसंगी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष तसेच शिवसेना ठाकरे गट व काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अमळनेर विधानसभा मतदार संघात एकच नारा...अनिल पाटील विजयी भव...

### व्यापारी वर्गातून दीपावली निमित्त भरभरून शुभेच्छा!





अमळनेर (प्रतिनिधी) –महायुतीचे उमेदवार मंत्री अनिल पाटील व खासदार स्मिता वाघ यांनी महायुतीची दिवाळी भेट पदयात्रा काढत लहान, मोठे व्यावसायिक व व्यापारी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या, यावेळी सर्वानीच विजयी भवच्या शुभेच्छा व आशीर्वाद त्यांना दिले.लक्ष्मी पूजनाच्या दिवशी सकाळीच पाच पावली देवी मंदिरात सर्व भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी नगरसेवक सर्व एकत्रित आल्यानंतर तेथून वाजत गाजत महायुती सह अनिल पाटील व स्मिता वाघ यांचा जयघोष करीत पदयात्रेस सुरूवात झाली. यावेळी दोघांनी प्रत्येक व्यापारी बांधवांच्या दुकानात जाऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वच व्यापारी बांधव बाजारपेठत झालेले नवीन रस्ते, यामुळे व्यापारी व ग्राहकांची झालेली सोय, शहरात सर्वत्र झालेले रस्ते व विकास कामे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शहरातील गुंडगिरी १०० टक्के थांबल्याने व्यापारी बांधवाचे झालेले संरक्षण या बाबींचा आवर्जून उल्लेख करत आम्ही अनिल पाटील यांनाच पुन्हा आमदार म्हणून पाहू इच्छितो यामुळे मतदान तर त्यांनाच करू असे सांगताना दिसत होते, शहरासाठी मंजूर झालेली दररोज पाणी देणारी २०० कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना देखील शहराच्या अर्थकरणास चालना देणारी ठरेल असेही काहींनी सांगितले. याशिवाय व्यापारी बांधव महायुतीच्याच पाठीशी असल्याचे काही व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले. यावेळी शिवाजी मार्केट, बाजारपेठ परिसर, भागवत रोड, मारवाडी गल्ली, स्टेशन रॉड, सुभाष चौक परिसर, कुंटे रोड, दाणा बाजार, सराफ बाजार आदी परिसरातुन ही पदयात्रा काढण्यात आली. काही व्यापारी देखील स्वयंस्फूर्तीने यात सहभागी झाले होते. एकंदरीत आपुलकीचा भाव या पद यात्रेतून व्यावसायिक व व्यापारी बांधवाना दिसून आला. दुपारपर्यत ही पदयात्रा सुरूच होती, महायुतीच्या कार्यकर्त्यांचा अतिशय मोठा ताफा आणि उत्साह असल्याने या पद यात्रेने संपूर्ण बाजार पेठेचे लक्ष वेधले होते. यात महायुतीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच माजी नगरसेवक सहभागी झाले होते

#### व्यापारी बांधवांचा महायुतीला पाठिंबा

लोकसभा निवडणुकीत सर्व लहान मोठे व्यावसायिक व व्यापारी बांधव भाजप व महायुतीच्याच पाठीशी होते, शहरातील प्रत्येक व्यापारी बांधवानी मला मतदान केले आहे. आजही आम्ही दिवाळी भेटीच्या निमित्ताने प्रत्येकाचा उत्तम प्रतिसाद अनुभवला असून यामुळे व्यापारी बांधव या निवडणुकीत देखील भाजप महायुतीच्याच पाठीशी असल्याचे स्पष्ट आहे. महायुती आणि विकास कामे या बळावर अनिल पाटलांना जोरदार समर्थन मिळेल यात शंका नाही

स्मिता उदय वाघ, खासदार, जळगाव लोकसभा मतदारसंघ

#### दिवाळीचे फटाके आम्हीच वाजवू

दिवाळीनिमित्त पदयात्रा फेरी काढून व्यापारी बांधवाना शुभेच्छा दिल्या. प्रत्येक ठिकाणी आम्हाला भरभरून प्रेम आणि आशीर्वाद मिळाले असून व्यापारी बांधवांचा हा प्रतिसाद पाहता दिवाळीचे खरे फटाके तर महायुतीच उडवणार असा विश्वास आम्हाला असून यात काही शंका नाही.

मंत्री अनिल भाईदास पाटील,महायुती उमेदवार

शहरात अनेकदा काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून व्यापारी बांधवाना धमकावून खंडणी मागणे किंवा धाकाने उधार माल घेऊन जाऊन पुन्हा तोंड न दाखवणे असे प्रकार घडत होते, परंतु अनिल पाटील हे आमदार झाल्यापासून अनेक गुंड प्रवृत्तीची धरपकड होऊन ते कोंडले गेल्याने आज खऱ्या अर्थाने व्यापारी सुरक्षित झाले निर्भिड पणे व्यवसाय होत आहे.

विजय कुमार जैन, व्यापारी प्रतिनिधी

## पुन्हा तोच आमदार निवडून न देण्याची अमळनेर विधानसभा मतदारसंघाची परंपरा... डॉ.अनिल शिंदे 'फिक्स' आमदार समर्थकांचा विश्वास



अमळनेर (प्रतिनिधी)– अमळनेर मतदारसंघात पुन्हा तोच आमदार निवडून न देण्याची परंपरा आहे. त्यामुळे या निवडणुकीत सर्वसामान्य नागरिकांचे ठरले असून डॉ.अनिल शिंदे हे 'फिक्स' आमदार असल्याचा विश्वास समर्थक व्यक्त करीत आहेत.अमळनेर तालुक्यातील जनतेने माजी आमदार शिरीष चौधरी आणि मंत्री अनिल पाटील दोघांची कारकीर्द अनुभवली असून तालुक्याचा शाश्वत विकास न झाल्याने तिसरा पर्याय म्हणून डॉ. अनिल शिंदे यांना पसंती असल्याचे समर्थकांकडून बोलले जात आहे.तर माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या कार्यकाळात कोणतीही विकास कामे झाली नाहीत. ठराविक दोन तीन कामांच्या नावावर मते मागण्याचा त्यांचा प्रयत्न असून गेली साडेचार वर्ष ते तालुक्यातून गायब होते. मात्र निवडणूक लागताच संपूर्ण परिवार तालुक्यात हजर झाला आहे. त्यांना कंटाळूनच तालुक्यातील जनतेने परत पाठवत भूमिपुत्र म्हणून भावनिक साद घालणाऱ्या अनिल पाटील यांना निवडून दिले होते. मात्र त्यांनीही दोन वेळा पळून जात अमळनेरच्या जनतेचा विश्वास घात केला. निवडून आल्यावर त्यांचे बोलणे चालणे बदलल्याने त्यांना निवडून देण्यासाठी परिश्रम करणारे खरे कार्यकर्ते त्यांच्यापासून दूर गेले. खा. शरदचंद्र पवार यांच्याशी व जनतेशी गद्दारी करत कॅबिनेट मंत्रिपद तर मिळवले मात्र तालुक्यातील जनतेच्या विकासासाठी त्याचा कोणताही उपयोग केला नसल्याचे जनताजनार्दन बोलत आहे. बाजूच्या चाळीसगाव तालुक्यात दुष्काळ जाहीर होतो मात्र मदत व पुनर्वसन मंत्र्याला स्वतःचा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करत येत नाही, हेच त्यांचे खरे अपयश आहे.

रुग्ण सेवा करणारा खरा भूमिपुत्र डॉ. अनिल शिंदे कोरोना काळात जेव्हा तालुक्यातील जनतेला खरी गरज होती. तेव्हा जनतेची सेवा करणारे डॉ. अनिल शिंदे हेच खरे भूमिपुत्र असल्याचे गावागावातील जनता बोलत आहे. सडेतोड व स्पष्टवक्ते असलेल्या डॉ. अनिल शिंदे यांच्या मनात कोणतेही कपट नाही, त्यामुळे ते खरोखर तालुक्याचा शाश्वत विकास करतील असा विश्वास समर्थक व्यक्त करीत आहेत. तालुक्यातील खेडोपाडी गोरगरीब जनतेची डॉ. शिंदे यांना पसंती मिळत आहे.

## जळगावात राजूमामा भोळे यांचा मॉर्निंग वॉक प्रचार; नागरिकांचा मोठा प्रतिसाद



जळगाव (प्रतिनिधी)– जळगाव शहर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार राजूमामा उर्फ सुरेश भोळे यांनी शहरातील विविध उद्यानामध्ये शनिवारी पहाटे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला विजयी करण्यासाठी आवाहन केले.त्यांच्या या आवाहनाला नागरिकांनी प्रतिसाद देऊन मोठ्या उत्साहात सकारात्मकता दर्शवली.

जळगाव शहर विधानसभा मतदारसंघातून आ.राजूमामा भोळे हे सलग तिसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. शनिवारी पहाटे शहरातील प्रसिद्ध भाऊंचे उद्यान, बहिणाबाई उद्यान आणि सागर पार्क मैदानावर आलेल्या नागरिकांशी राजूमामा भोळे यांनी भेट घेऊन संवाद साधला. यावेळी नागरिकांनी शहरातील विविध प्रश्नांविषयी चर्चा केल्या त्यात राजू मामा भोळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन नागरिकांचे समाधान केले.

जळगाव शहरातील विविध विकास कामांबाबत नागरिकांनी राजूमामा भोळे यांच्याजवळ समाधान व्यक्त केले. तसेच मतदार संघातील यंदाही उर्वरित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ.राजूमामा भोळे यांच्या पाठीशी कायम उभे राहू अशी ग्वाही नागरिकांनी याप्रसंगी दिली. गेल्या पंचवार्षिक काळात शासनाच्या विविध योजनांमुळे नागरिकांना दिलासा मिळाला असेही नागरिकांनी याप्रसंगी बोलून दाखविले.

## पाचोऱ्याचे आमदार किशोर पाटील झाले पालकमंत्री अन् राज्यमंत्री !




जळगाव (प्रतिनिधी) :– पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आ. किशोर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दि. १ नोव्हेंबर रोजी त्यांच्यावर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी त्यांना पालकमंत्री व राज्यमंत्री अशा उपाधि असलेल्या पाट्या देऊन त्यांचा अनोखा सन्मान केला. सध्या निवडणुकीचे वारे जोरात सुरू आहे. अर्ज भरण्याचा कालावधी संपल्यानंतर आता माघारीची वेळ सुरू झाली आहे. अशा कालावधीमध्ये आ. किशोर पाटील यांचा १ नोव्हेंबर रोजी वाढदिवस आला होता. ऐन लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आ. किशोर पाटील यांनी त्यांच्या शिवालय या कार्यालयामध्ये कार्यकर्ते व नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव स्वीकारला. यावेळी काहींनी ना. किशोर नर्मदा धनसिंग पाटील पालकमंत्री, जळगाव जिल्हा व काहींनी त्यांना ना. किशोर नर्मदा धनसिंग पाटील, राज्यमंत्री अशा नावाच्या पाट्या देऊन त्यांचे अभिनंदन केले.

## महापौर कालखंडातील विकास कामांच्या बळावर सौ.जयश्री महाजन यांना महिलांचे पाठबळ



जळगाव (प्रतिनिधी) – जळगाव शहर विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) कडून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार जयश्रीताई सुनील महाजन यांनी महिला उमेदवार म्हणून आपले नामांकन दाखल केले आहे.महापौर कालखंडातील विकास कामांच्या बळावर सौ. जयश्री महाजन यांना महिलांचे पाठबळ मिळत आहे.त्यांनी केलेला विकासाच्या मुद्यावर त्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. नुकतेच त्यांनी सदाशिव नगर, यमुना नगर, चौधरी वाडा, कोल्हे वाडा आणि अयोध्या नगर या भागांमध्ये भेट देऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आपल्या आजवरच्या कार्याचा आढावा सांगतांनाच परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

यावेळी अनेक मतदारांनी शहरातील निकृष्ट रस्त्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. जयश्रीताईंनी रस्त्यांच्या कामांसाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची ग्वाही यावेळी दिली. महापौर म्हणून काम करताना नगरसेवकाच्या पक्षपातीपणापेक्षा शहराच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले. याच कार्याच्या बळावर त्यांनी मतदारांना विश्वासाने मतदान करण्याचे आवाहन केले. जयश्रीताईंनी महिलांना विशेष आवाहन करतांना म्हटले, की महिलांना नेतृत्वात आणण्याच्या दिशेने या निवडणूकीत महिलांची मोठी जबाबदारी आहे. महिलांनी एकत्र येऊन मला निवडून द्यावे, ही माझी अपेक्षा आहे. शिक्षिका असल्यामुळे शिस्तबद्ध व कुशल कार्य करण्याची सवय असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले आणि जळगावला अग्रस्थानी नेण्यासाठी संधी मिळावी, अशी आशा व्यक्त केली.

शहरातील विविध मुद्द्यांवर बोलताना स्वामी समर्थ मठाच्या समस्येवर त्यांनी सक्रियतेने आंदोलन केल्याचा दाखला दिला. जळगाव ही माझी जन्मभूमी व कर्मभूमी असून, येथे कोणत्याही प्रकारच्या समस्यांसाठी मी नेहमीच सज्ज आहे, असे ठामपणे त्यांनी नमूद केले.

जयश्रीताईंनी तरुणांना आश्वासन देत म्हटले की, गावातील तरुणांना नोकरीसाठी बाहेरगावी जावे लागू नये म्हणून प्रयत्न करणार आहे. मला संधी द्या, मी माझे शब्द नक्कीच पाळेल. या निवडणुकीने शहरात परिवर्तनासाठी महिलांचे नेतृत्व आणि तरुणांसाठी संधीचा नवा अध्याय खुला होईल, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत जयश्रीताईंसारखा आश्वासक महिला उमेदवार असल्याने जळगावातील मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.